आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
२५ जून २०२५ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- भारतीय अंतराळवीर शुभांशु शुक्लांचं फाल्कन नाईन रॉकेटमधून यशस्वी उड्डाण/ अंतराळातून देशवासियांसाठी पाठवला संदेश

- संविधान हत्या दिनानिमित्त मानवाधिकारांच्या मूल्यांचं संवर्धन करण्याच्या हेतूनं आज देशभरात विविध कार्यक्रम

- बालगंधर्व जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ अभिनेत्री लीला गांधी यांना प्रदान

**आणि**

- भालाफेकपटू नीरज चोप्राने पटकावलं ओस्ट्रावा गोल्डन स्पाईक स्पर्धेत सुवर्णपदक

**<><><><><>**

नासाच्या ॲक्सिओम फोर या अंतराळ मोहिमेत सहभागी झालेले भारतीय अंतराळवीर शुभांशु शुक्ला यांनी अंतराळातून संदेश पाठवला आहे. हा प्रवास अद्भुतरम्य असून साडे सात किलोमीटर प्रति सेकंद इतक्या वेगाने आपण पृथ्वीभोवती फिरत आहोत, असं शुक्ला या संदेशात म्हणाले आहेत…

**होल्ड बाईट - शुभांशु शुक्ला**

भारतीय अंतराळवीर शुभांशु शुक्ला यांना घेऊन फाल्कन नाईन हे रॉकेट आज अंतराळात झेपावलं. अमेरिकेची अंतराळ संशोधन संस्था नासाच्या ॲक्सिऑम फोर या अवकाश मोहिमेला आज फ्लोरिडा इथे केनेडी स्पेस सेंटरवरून आज दुपारी बारा वाजून १ मिनिटाने प्रारंभ झाला. या रॉकेटमधल्या स्पेसएक्स ड्रॅगन या अंतराळयानातून चार अंतराळवीरांचं पथक आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाच्या दिशेने प्रवास करत आहे. या मोहिमेचं नेतृत्व अमेरिकेचे कमांडर पेगी व्हिटसन करत

आहेत. हंगेरीचे टिबोर कापू आणि पोलंडचे स्लावोस उझनान्स्की हे या मोहिमेतले तज्ज्ञ आहेत. तर शुभांशू शुक्ला पायलट म्हणून काम पाहत आहेत.

यंदाच्या २९ मे रोजी हे उड्डाण नियोजित होतं. मात्र ही मोहीम तांत्रिक अडचणींमुळे आतापर्यंत अनेक वेळा पुढे ढकलण्यात आली होती.

**<><><><><>**

ॲक्सिओम फोरच्या यशस्वी उड्डाणाबद्दल सर्वत्र आनंद व्यक्त होत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या मोहिमेच्या यशस्वी प्रक्षेपणाबद्दल अभिनंदन केलं आहे. भारतीय अंतराळवीर ग्रुप कॅप्टन शुभांशु शुक्ला हे आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर जाणारे पहिले भारतीय बनणार आहेत. ते या प्रवासात एकटे नसून त्यांच्यासोबत १४० कोटी भारतीयांच्या इच्छा, आशा आणि आकांक्षा आहेत. शुक्ला आणि त्यांच्या सहकारी अंतराळवीरांना या मोहिमेच्या यशासाठी शुभेच्छा असं प्रधानमंत्री आपल्या समाज माध्यमावरच्या संदेशात म्हणाले आहेत.

केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री डॉक्टर जितेंद्र सिंह यांनी आपल्या समाज माध्यमावरच्या पोस्टमध्ये म्हटलं आहे की, कॅप्टन शुभांशु शुक्ला या मोहिमेदरम्यान सूक्ष्म गुरुत्वाकर्षणाशी संबंधित सात प्रयोग करतील. यात किरणोत्सर्गाचा शैवालांवर होणारा परिणाम, अवकाशात बियाणं पेरणं अशा विविध प्रकारच्या प्रयोगांचा समावेश आहे.

**<><><><><>**

संविधान हत्या दिवस आज पाळण्यात येत आहे. २५ जून १९७५ या दिवशी तत्कालीन प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांनी देशात आणीबाणी लागू केली होती. १९७५ मध्ये या दिवशी तत्कालीन राष्ट्रपती फखरुद्दीन अली अहमद यांनी अंतर्गत अशांततेच्या धोक्यांचा हवाला देत कलम ३५२ अंतर्गत आणीबाणीची घोषणा

केली. या १८ महिन्यांच्या काळात मानवाधिकारांसाठीच्या लढ्यात प्राण अर्पण करणाऱ्या सर्वांना आजच्या संविधान हत्या दिनी आदरांजली वाहण्यात येत आहे. या निमित्तानं प्रत्येक भारतीयाच्या मनात वैयक्तिक स्वातंत्र्य आणि लोकशाहीची ज्योत तेवत राहते, तसंच हुकुमशाही प्रवृत्तींशी लढा देण्याची प्रेरणा मिळत राहावी याकरता हा दिवस गेल्या वर्षीपासून पाळला जातो.

आकाशवाणीच्या मन की बात या कार्यक्रमातून आपले विचार मांडताना प्रधानमंत्री मोदी यांनी आणीबाणीचं वर्णन देशाच्या इतिहासातला सर्वात काळा अध्याय असं केलं होतं. सत्तेची वाटचाल हुकूमशाहीच्या दिशेने सुरू झाली तर लोकशाहीत ती सत्ता उखडून टाकण्याची ताकद असते, याचं स्मरण करण्याचा आजचा दिवस असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आपल्या समाज माध्यमावर म्हटलं आहे.

आणीबाणीच्या काळात नवीन नेतृत्वाची बीजं रोवली गेली आणि त्यातून नरेंद्र मोदी नावाचा नेता घडला याची कथा सांगणाऱ्या पुस्तकाचं प्रकाशन आज अमित शाह यांच्या हस्ते होणार आहे.

**<><><><><>**

संविधान हत्या दिनानिमित्त मानवाधिकारांच्या मूल्यांचं संवर्धन करण्याच्या हेतूनं आज देशभरात विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

२५ जून १९७५ हा दिवस भारतीय लोकशाहीसाठी सगळ्यात काळा दिवस असून अशा त्याची पुनरावृत्ती होऊ नये, म्हणूनच तो दिवस कायम लक्षात राहण्याची गरज आहे, असं प्रतिपादन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी आज केलं. संविधान हत्या दिवसानिमित्त मुंबईत राजभवन इथं आणीबाणीत संघर्ष करणाऱ्यांच्या स्मरणार्थ आणि सन्मानार्थ आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. या

काळात देशाची लोकशाही वाचवण्यासाठी संघर्ष करणाऱ्या नागरिकांमुळेच आज भारत जगातली सर्वात मोठी लोकशाही म्हणून उभा आहे, असं त्यांनी सांगितलं. आणीबाणी जाहीर झाली त्या दिवसाचं आणि आणीबाणीच्या कालखंडाचं स्मरण त्यांनी केलं.

आणीबाणी लागू करणं ही लोकशाहीची हत्या होती, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशाला दिलेली राज्यघटना संपवणारा तो काळा दिवस होता, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी बोलताना सांगितलं. या काळात लोकशाहीच्या सेनानींच्या लढ्यामुळे भारताची राज्यघटना आणि लोकशाही वाचली. आता भारताची लोकशाही इतकी प्रगल्भ आहे, की कुणीही कितीही प्रयत्न केला, तरी ती संपवू शकणार नाही, असंही फडणवीस यांनी नमूद केलं. ते म्हणाले,

**होल्ड... बाइट- देवेंद्र फडणवीस (३५ सेकंद)**

आणीबाणीच्या काळात देशाच्या लोकशाहीसाठी लढा देणाऱ्या सर्व ज्ञात-अज्ञात भारतीयांचा संघर्ष कायमच आपल्यासाठी प्रेरणादायी, ऊर्जादायी ठरेल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.

यावेळी मान्यवराच्या हस्ते आणीबाणीच्या विरोधात लढा देणाऱ्यांचा सन्मानही करण्यात आला. विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, मंत्री मंगलप्रभात लोढा, आशीष शेलार, अशोक उइके आणि इतर यावेळी उपस्थित होते.

**<><><><><>**

मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठानं शाळा आणि महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांना अंमली पदार्थ, सिगारेटींची विक्री होत असल्याच्या प्रकरणाची स्वतःहून दखल घेतली आहे. छत्रपती संभाजीनगरमध्ये विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात अंमली पदार्थ, सिगारेटी आणि ई-सिगारेटची विक्री होत असल्याची

बातमी प्रसिद्ध झाल्यानंतर न्यायमूर्ती रवींद्र घुगे आणि न्यायमूर्ती वाय. जी. खोब्रागडे यांच्या पीठानं त्याची दखल घेतली. हे असंच चालू राहिलं, तर तरुण विद्यार्थी व्यसनाधीन होतील, असा इशारा न्यायालयानं दिला आणि यासंदर्भात जनहित याचिका दाखल करून घ्यायचे निर्देश दिले.

<><><><>

बालगंधर्व परिवाराच्या वतीने दिला जाणारा बालगंधर्व जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ अभिनेत्री लीला गांधी यांना काल केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्य मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते पुण्यात प्रदान करण्यात आला. यावेळी आमदार उल्हास पवार, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे अध्यक्ष प्रशांत दामले, बालगंधर्वांच्या नात सून अनुराधा राजहंस यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

यावेळी छायाचित्रकार अक्षय परांजपे, पत्रकार कल्याणी फडके- केळकर, नाट्यनिर्माते- पत्रकार अशोक घावटे, नाट्य अभ्यासक आणि लेखक जयराम पोतदार, गायिका आशा खाडिलकर यांना बालगंधर्व गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं.

<><><><>

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांची पालखी उद्या दुपारी नीरानदी स्नानानंतर सातारा जिल्ह्यात प्रवेश करणार आहे. एक दिवसाचा मुक्काम आटोपून पालखी सोहळा शुक्रवारी तरडगावकडे मार्गस्थ होईल. याठिकाणी पालखीचा दुसरा मुक्काम असून वाटेत चांदोबांचा लिंब इथं सोहळ्यातलं पहिलं उभं रिंगण होणार आहे. पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर या परिसरातल्या संपूर्ण वाहतूक व्यवस्थेत बदल करण्यात आला आहे.

**अहिल्यानगर** जिल्ह्यात भिंगारमध्ये संत जनार्दन स्वामी महाराज दिंडीचं राष्ट्रवादीच्या वतीने भक्तीभावाने स्वागत करण्यात आलं. यावेळी पालखीतील पादुकांचं पूजन करण्यात आलं. नगर-करमाळा मार्गे ही दिंडी पंढरपूरला प्रस्थान करणार आहे.

संत एकनाथ महाराजांच्या पालखीनं, **बीड** जिल्ह्यात सर्वात खडतर म्हणून ओळखला जाणारा गारमाथ्याचा डोंगर काल पार केला.

आषाढी वारीसाठी **लातूर** जिल्ह्यातून पंढरपूरला जाणाऱ्या आणि येणाऱ्या वारकऱ्यांच्या हलक्या आणि जड वाहनांना येत्या दहा जुलैपर्यंत पथकरातून सूट देण्यात येणार आहे. त्यासाठीचं पथकर सवलत प्रवेशपत्र लातूरच्या प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयातून घेता येणार आहे.

**<><><><><>**

भारताचा भालाफेकपटू नीरज चोप्रा याने ओस्ट्रावा गोल्डन स्पाईक स्पर्धेत सुवर्णपदक पटकावलं. नीरजने ८५ मीटर २९ सेंटीमीटर अंतरावर भाला फेकला, नीरजने गेल्याच आठवड्यात पॅरिस इथे झालेल्या डायमंड लीग स्पर्धेतही सुवर्णपदक मिळवलं होतं.

**<><><><><>**

हॉकी इंडिया मास्टर्स चषक स्पर्धेतला उपांत्य फेरीचा पहिला आणि दुसरा सामना आज चेन्नई इथं होणार आहे . या उपांत्य फेरीत ओडिशाची लढत महाराष्ट्राबरोबर होणार आहे. तर तामिळनाडूचा सामना चंदीगडशी होईल.

**//<><><><><>//**